**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२.**
**रजि. ऑफीस -** " आदिवासी विकास भवन ", २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२
**दुरध्वनी -** (०२५३) २५७१७८२,२५७६८६०, फॅक्स- (०२५३) २५७१५६०.
Web-www.mahatdc.in, mail- msctdcnsk@gmail.com

जा. क्र.आविम/प्रशा/आस्था-२/४७९९/२०१६
ना शि क : दिनांक : ०८ मार्च, २०१६

## संक्षीप्त विशेष सुचना

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक, यांचे आस्थापनेवरील **उपप्रादेशिक व्यवस्थापक / व्यवस्थापक (प्रशासन / विपणन)** या पदाच्या भरती प्रक्रियेसाठी दिनांक १४/१२/२०१४ रोजी घेतलेल्या लेखी परीक्षेत कागदपत्र पडताळणीच्या अधिन पात्र ठरलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांची अंतरीम निवड यादी व अंतरीम प्रतिक्षा यादी www.tribalexam.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अंतरीम यादीतील उमेदवारांनी खालील नमूद ठिकाणी व दिनांकास जाहीरातीतील संबंधीत पदांच्या अनुषंगाने नमूद केलेली सर्व शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाकरीता नमूद केलेल्या पात्रतेविषयीची कागदपत्रे, आवश्यक तांत्रीक / विशेष पात्रतेविषयीची कागदपत्रे, नजिकच्या काळातील फोटो व ओळखपत्र इत्यादी पडताळणीसाठी मुळ प्रती व त्यांच्या छायांकित साक्षांकित प्रतींचा एक संच घेवून उपस्थित राहावे. याबाबत संबंधीत उमेदवारांना पत्राद्वारे कळविण्यांत आले आहे. कागदपत्र पडताळणी बाबतचा नमुना सोबत जोडला आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | दिनांक | वेळ | कागदपत्र पडताळणीसाठीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | **उपप्रादेशिक व्यवस्थापक** | १५.०३.२०१६ | सकाळी १०:३० वा. पासुन ते सायंकाळी १७:३० वा पर्यंत | महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक. आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२. |

**कागदपत्रे तपासणीस बोलविलेल्या उमेदवारांना खालील बाबी लागु राहतील.**

१) परीक्षा शुल्काची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी केली जाणार नाहीत.
२) कागदपत्र तपासणीस येणाऱ्या उमेदवारास येण्या/जाण्याचा प्रवास खर्च अगर कोणत्याही प्रकारचा भत्ता किंवा मोबदला दिला जाणार नाही.
३) कागदपत्र तपासणीसाठी बोलवीले म्हणजे नेमणुक दिली जाईलच असे नाही.
४) लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही. तसेच कागदपत्र तपासणीसाठी उमेदवार गैरहजर राहील्यास उमेदवाराचा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
५) मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यकता असल्यास अद्यावत नॉनक्रिमीलेअर दाखला इत्यादी प्रमाणपत्रे मिळणेसाठी उमेदवाराने सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही.
६) जर आपणाकडे अर्जात नमूद प्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे नसतील तर आपल्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार नाही व त्या अनुषंगाने आपली कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्र -३

व्यवस्थापकीय संचालक
म. रा. सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.
नाशिक करीता.

स्थळ प्रतिवर मा.व्य.सं. यांची स्वाक्षरी असे.